कार्यालयीन आदेश क्र. १०८८

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
प्रशासन विभाग,
दिनांक :-२७/११/२०२०.

**संदर्भ:- मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांची दि.२७/११/२०२० रोजीची मान्य टिपणी.**

पुणे महानगर परिवहन महामंडळा मार्फत मा. संचालक मंडळ ठराव क्र.४१,दि.२३/१२/२०१६ चे मान्यते नुसार बदली कंडक्टर एकुण पदे ४१००, बदली ड्रायव्हर एकुण पदे २४४०, बदली क्लिनर ७०० या पदाकरीता जाहिरात क्र.४२,दि.३०/१२/२०१६ अन्वये दैनिक सकाळ व महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली. सदर जाहिराती नुसार ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले

महामंडळाने प्रसिध्द केलेल्या जाहिरात क्र.४२,दि.३०/१२/२०१६ नुसार दि.०१ व ०२/०४/२०१७ रोजी मे. महाऑनलाईन संस्थेमार्फत घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेत उमेदवारांना मिळालेले गुण महाऑनलाईनने वेबसाईटवर तात्काळ प्रसिध्द केले. मिळालेल्या उच्चतम गुणानुसार महामंडळाच्या आवश्यकतेनुसार एकुण ६६१ बदली वाहक, एकुण ११० बदली क्लिनर व एकुण १२२१ बदली चालक यांना सेवेत रूजू करून घेतले

पुणे महानगर परिवहन महामंडळा मार्फत प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीमध्ये प्रत्येक पदाच्या प्रवर्ग निहाय आरक्षणानुसार अंतिम प्रतिक्षा निवड यादी प्रसिध्द झालेल्या दिनाकांपासून १ वर्षा करीता वैध राहील असे नमूद आहे. तसेच मे. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक-प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ,दि.२७ जून २००८ मध्ये निवड सूचीची कालमर्यादा निवड समितीने तयार केलेली निवड सूची १ वर्षासाठी किंवा निवड सूची तयार करताना ज्या दिनाकां पर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आलेली आहे. त्या दिनाकां पर्यंत नंतर घडेल त्या दिनाक्रां पर्यंत विधीग्राहय ठरेल त्यानंतर हि निवड सूची व्यपगत होईल असे नमूद केलेले आहे. तसेच पुणे महानगरपालिका (सेवा प्रवेश व सेवाचे वर्गीकरण) नियम १४ परिशिष्ट १ मधील अनु. क्र. ६ मध्ये तयार करण्यात आलेली निवड सूची तयार केल्याच्या दिनाकांपासून १ वर्षाच्या कालावधी पर्यंत वैध राहील असे नमूद आहे. तसेच महामंडळाचे वकील यांनी दि.१७/१०/२०२० रोजी दिलेल्या अभिप्रायामध्ये जाहिरातीमध्ये नमूद केलेला १ वर्षाचा कालावधी संपलेला आहे. ही बाब विचारात घेता सन २०१७ मध्ये निवड यादी प्रसिध्द केलेनंतर १ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने सदरची भरती प्रक्रिया रद्द करणेत येत आहे.

सहव्यवस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

**मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे मान्यतेनुसार**

**प्रत** – आस्थापना, सर्व खातेप्रमुख, विभागप्रमुख.

E:\September\September 2.docx